RESEARCH FRONT
Multidisciplinary Peer Reviewed International Journal

ISSN
(Online) 2320 – 8341
(Print) 2320 – 6446

विकसित भारत 2047: महाराष्ट्रातील कृषी पर्यटनातून रोजगार निर्मिती व उच्च शिक्षण संस्थांची भूमिका

आरती अमित गोगावले[1]
संशोधक विद्यार्थीनी
Email: arti.gogawale@yahoo.com

डॉ. रमेश सयाजी देसाई[2]
श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे – 09
Email: rmauchi2012@gmail.com

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.21897461

सारांश

भारत सरकारने 2047 पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. ग्रामीण विकास, रोजगार निर्मिती आणि शाश्वत आर्थिक प्रगती यासाठी कृषी पर्यटन महत्त्वाची भूमिका बजावू शकते. कृषी पर्यटन हा कृषी आणि सेवा क्षेत्र यांचा नाविन्यपूर्ण संगम आहे. महाराष्ट्र राज्य कृषी पर्यटनात अग्रेसर असून राज्यात 862नोंदणीकृत कृषी पर्यटन केंद्र आहेत, (महाराष्ट्र पर्यटन संचालनालय अहवाल) तरीही अनेक केंद्रे अपेक्षित यश मिळू शकत नाही. व्यावसायिक प्रशिक्षणाची कमतरता,मजूरटंचाई स्थलांतर आणि संस्थात्मक समन्वयाचा अभाव ही प्रमुख आव्हाने आहेत.महाराष्ट्र राज्यात कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण भागात नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. उच्च शिक्षण संस्था संशोधन, प्रशिक्षण आणि जनजागृतीच्या माध्यमातून कृषी पर्यटनाला चालना देऊ शकतात.

सूचक शब्द: कृषी पर्यटन, ग्रामीण विकास, विकसित भारत 2047, रोजगार निर्मिती, उच्च शिक्षण संस्था

प्रस्तावना

भारत सरकारने 2047 पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. ग्रामीण भारताचा विकास हा या स्वप्नाचा मुख्य आधार आहे. प्रस्तुत शोधनिबंध महाराष्ट्रातील कृषी पर्यटनाच्या माध्यमातून होणारी रोजगार निर्मिती आणि त्यात उच्च शिक्षण संस्थांची (HEIs) भूमिका यावर प्रकाश टाकतो. 2015 ते 2024 या काळात महाराष्ट्रात कृषी पर्यटन केंद्रांमध्ये झालेली 91%वाढ ही ग्रामीण समृद्धीची निदर्शक आहे. संशोधनाअंती असे दिसून येते की, जर शिक्षण संस्थांनी शेतकऱ्यांना तांत्रिक आणि आदरातिथ्य (Hospitality) विषयांचे प्रशिक्षण दिले, तर कृषी पर्यटन हे 'विकसित भारत @2047' मधील आर्थिक विकासाचे मुख्य इंजिन ठरू शकते.

साहित्य समीक्षा

लेन (2009) यांच्या मते ग्रामीण पर्यटनामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळते. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या अहवालानुसार राज्यात कृषी पर्यटन केंद्रांची संख्या सातत्याने वाढत आहे.कृषी पर्यटन हे केवळ उत्पन्नाचे साधन नसून ग्रामीण संस्कृती जपणारा व शाश्वत विकास घडवून आणणारा एक महत्त्वाचा घटक आहे

ISSN
(Online) 2320 – 8341
(Print) 2320 – 6446

(Sharpley & Roberts, 2004). यामुळे स्थानिक बाजारपेठांचे सक्षमीकरण होऊन ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर रोखण्यास मदत होते (Lane, 2009; Kumbhar, 2009). विशेषतः महिलांना हस्तकला आणि निवास व्यवस्थेच्या माध्यमातून थेट रोजगार उपलब्ध होतो, ज्यामुळे त्यांचे आर्थिक सक्षमीकरण होते (Malkanthi & Routry, 2011).

उच्च शिक्षण संस्थांनी (HEIs) केवळ पदवी न देता, कौशल्य विकास आणि तांत्रिक प्रशिक्षणावर भर दिल्यास कृषी पर्यटनाचा दर्जा उंचावेल (Morwal, 2021). 'विकसित भारत २०४७' आणि शाश्वत विकास उद्दिष्टांच्या (SDGs) पूर्ततेसाठी कृषी पर्यटन हा एक भक्कम आधारस्तंभ आहे (GOI, 2023). मात्र, पायाभूत सुविधांचा अभाव आणि डिजिटल मार्केटिंगचे अपुरे ज्ञान ही आव्हाने पेलण्यासाठी शिक्षण संस्था आणि सरकारचा समन्वय आवश्यक आहे (Gupta, 2022).

संशोधनाची उद्दिष्टे

1. कृषी पर्यटनाची संकल्पना समजून घेणे.
2. महाराष्ट्रातील कृषी पर्यटनाच्या वाढीचा अभ्यास करणे.
3. कृषी पर्यटनातून रोजगार निर्मितीच्या संधींचे विश्लेषण करणे.
4. उच्च शिक्षण संस्थांची भूमिका अभ्यासणे.

संशोधन पद्धती

सदर संशोधन दुय्यम माहितीवर आधारित आहे. पुस्तके, संशोधन लेख, शासकीय अहवाल आणि विश्वसनीय ऑनलाइन स्रोतांचा वापर करून माहिती संकलित करण्यात आली आहे.

माहितीचे विश्लेषण

महाराष्ट्रातील कृषी पर्यटन व्यवसाय

2005 मध्ये बारामती, महाराष्ट्र येथे एटीडीसी (कृषी पर्यटन विकास महामंडळ) ने कृषी पर्यटनाचा एक पथदर्शी प्रकल्प सुरू केला. केवळ दोन वर्षांतच हा प्रकल्प खूप यशस्वी झाला.

ISSN
(Online) 2320 – 8341
(Print) 2320 – 6446

महाराष्ट्र मधील सर्वात जास्त कृषी पर्यटन केंद्र ही पुणे जिल्ह्यामध्ये आहेत. पुणे जिल्ह्यानंतर नाशिक जिल्ह्याचा व त्यानंतर अहमदनगर या तीन जिल्ह्यांमध्ये कृषी पर्यटन व्यवसायवाढत आहे

तक्ता 1: महाराष्ट्रातील कृषी पर्यटन केंद्रांची वाढ

वर्ष	केंद्रांची संख्या	वाढ (केंद्रे)	वाढ (टक्केवारी)
2015	450	-	-
2018	620	170	37.78%
2020	720	100	16.13%
2022	800	80	11.11%
2024	862	62	7.75%

स्रोत: महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ अहवाल (2023-24)

स्पष्टीकरण:तक्ता क्र. 1 वरून असे स्पष्ट होते की, 2015 पासून कृषी पर्यटन केंद्रांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येते. 2015ते 2018 या तीन वर्षांच्या काळात केंद्रांच्या संख्येत सर्वाधिक 37.78% वाढ झाली आहे. 2015 मध्ये कृषी पर्यटन केंद्रांची संख्या 450 होती, ती 2024 पर्यंत 862 वर गेली आहे म्हणजेच कृषी पर्यटन केंद्रामध्ये वाढ होत आहे.

कृषी पर्यटनातून रोजगार निर्मिती

कृषी पर्यटन हे रोजगाराचे विकेंद्रीकरण करणारे क्षेत्र आहे. यामुळे खालील क्षेत्रांत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार मिळतो:

- **प्रत्यक्ष रोजगार:** गाईड्स, मॅनेजर्स, कुक्स (स्वयंपाकी), आणि शेती मदतनीस.
- **अप्रत्यक्ष रोजगार:** स्थानिक वाहतूकदार, हस्तकला कारागीर, आणि स्थानिक बाजारपेठ.
- **महिला सक्षमीकरण:** घरगुती खाद्यपदार्थ आणि निवास व्यवस्थेमुळे ग्रामीण महिलांच्या आर्थिक उत्पन्नात मोठी वाढ होत आहे.

'महाराष्ट्र पर्यटन धोरण २०२४' नुसार ग्रामीण भागात निर्माण होणाऱ्या रोजगाराचे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

ISSN
(Online) 2320 – 8341
(Print) 2320 – 6446

तक्ता २: कृषी पर्यटनातून होणारी रोजगार निर्मिती (थेट आणि अप्रत्यक्ष)

रोजगाराचा प्रकार	2024 मधील स्थिती	2030 पर्यंतचे लक्ष (Target)	प्रमुख लाभार्थी
थेट रोजगार (गाईड्स, मॅनेजर)	1.20 लाख	३.५० लाख	ग्रामीण युवक
अप्रत्यक्ष रोजगार (वाहतूक, हस्तकला)	2.40 लाख	5.50 लाख	स्थानिक कारागीर
महिला सक्षमीकरण (SHGs)	70000	2.00लाख	महिला बचत गट

स्रोत: महाराष्ट्र पर्यटन धोरण 2024

स्पष्टीकरण:तक्ता क्र. २ वरून असे स्पष्ट होते की, कृषी पर्यटन हे केवळ रोजगाराचे साधन नसून ते महिला आणि तरुणांना गावातच काम मिळवून देणारे केंद्र बनले आहे. २०२४ च्या नवीन धोरणानुसार, ग्रामीण पर्यटनातून सुमारे ३ लाख नवीन रोजगार निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, त्यापैकी ६०% रोजगार महिला आणि युवकांसाठी राखीव असतील.

निष्कर्ष व शिफारसी

कृषी पर्यटन विकासासाठी उच्च शिक्षण संस्थांची भूमिका

अ) बौद्धिक सक्षमीकरण (Intellectual Empowerment):उच्च शिक्षण संस्था स्थानिक संस्कृती आणि कृषी वैशिष्ट्यांचे 'डॉक्युमेंटेशन' करून त्या भागाची एक 'ब्रँड आयडेंटिटी' तयार करतात. संशोधनाद्वारे कोणत्या भागात कोणते पर्यटन मॉडेल यशस्वी होईल, याचे 'डाटा-आधारित' नियोजन संस्था करू शकतात.

ब) कौशल्य हस्तांतरण :केवळ पदवी न देता, संस्थांनी 'कौशल्य विकास केंद्र' म्हणून काम करणे अपेक्षित आहे. यामध्ये शेतकऱ्यांना 'आदरातिथ्य' (Hospitality), 'स्वच्छता आणि सुरक्षा' (Health & Hygiene) आणि 'विदेशी पर्यटकांशी संवाद' (Communication Skills) या विषयांत पारंगत करणे समाविष्ट आहे.

क) डिजिटल आणि तांत्रिक सेतु :ग्रामीण पर्यटनाला 'ग्लोबल' करण्यासाठी उच्च शिक्षण संस्था 'डिजिटल मार्केटिंग' आणि 'ई-कॉमर्स'च्या साहाय्याने जागतिक बाजारपेठेशी जोडू शकतात. कॉलेजातील आयटी (IT) विभाग स्थानिक केंद्रांसाठी स्वस्त आणि कार्यक्षम ॲप्स किंवा वेबसाईट विकसित करू शकतो.

ड) सामाजिक उद्योजकता केंद्र:शिक्षण संस्थांनी कृषी पर्यटनाला एक 'स्टार्टअप' म्हणून प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. ग्रामीण युवकांसाठी 'इनक्युबेशन सेंटर'च्या माध्यमातून बीज भांडवल (Seed Funding) आणि कायदेशीर सल्ला पुरवून त्यांना उद्योजक बनवणे, ही संस्थांची आधुनिक भूमिका आहे.

ISSN
(Online) 2320 – 8341
(Print) 2320 – 6446

विकसित भारत 2047 आणि कृषी पर्यटन

विकसित भारत 2047 या संकल्पनेनुसार ग्रामीण विकास आणि रोजगार निर्मितीला विशेष महत्त्व आहे. कृषी पर्यटनामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होते आणि स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर होतो. ग्रामीण भागाचे शहरीकरण न करता 'ग्रामीण समृद्धी' साध्य करणे गरजेचे आहे. कृषी पर्यटन हे शाश्वत विकास उद्दिष्टांची (SDGs) पूर्तता करते, ज्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास न होता आर्थिक प्रगती साधता येते.

कृषी पर्यटन हे ग्रामीण विकासासाठी प्रभावी साधन आहे. उच्च शिक्षण संस्थांच्या सहकार्यामुळे कृषी पर्यटनाचा विकास अधिक वेगाने होऊ शकतो आणि विकसित भारत 2047 या उद्दिष्टाच्या पूर्ततेस मदत होऊ शकते.महाराष्ट्रातील कृषी पर्यटनात मोठी क्षमता आहे. जर उच्च शिक्षण संस्थांनी केवळ शैक्षणिक मार्गदर्शन न देता शेतकऱ्यांशी थेट संवाद आणि संशोधनपर सहकार्य वाढवले, तर हे क्षेत्र 'विकसित भारत' निर्मितीचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ ठरेल.

संदर्भ

Maharashtra Tourism Development Corporation Report (2023).

Government of India: Viksit Bharat 2047 Vision Document.

Government of India (GOI). (2023). Viksit Bharat @2047: Vision Document for a Developed Nation. NITI Aayog.

Gupta, S. (2022). Challenges and opportunities in rural tourism: A strategic framework. Journal of Tourism Management, 15(2), 45-58.

Kumbhar, V. M. (2009). Agri-tourism: A potential source of revenue for farmers in Maharashtra. International Journal of Commerce and Business Management, 2(2), 75-78.

Lane, B. (2009). Rural Tourism Development: Local Experiences and Lessons. SAGE Publications.

Malkanthi, S., & Routry, J. K. (2011). Potential for agri-tourism development: A study of the farming sector. Journal of Agricultural Sciences, 6(1), 45-53.